सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.

काम सुरु करण्यास व वृक्ष तोडण्यास परवानगी देण्याबाबत.

राष्ट्रीय महामार्ग क्र.५० खेड ते सिन्नर कि.मी. ९७/००० ते १५७/००० (अहमदनगर जिल्हयातील भाग) चार पदरीकरण तसेच मजबुतीकरण करण्याकरिता अहमदनगर जिल्हयातील ३३.९५८५ हेक्टर राखीव वनजमिन वळतीकरणाबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन आदेश क्रमांकः एफएलडी-१८१४/प्र.क्र.९२/फ-१०

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक २४/०६/२०१५

वाचा:-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१७/एनसी/II/आयडी-१२३२३/(१३)/५८/१४-१५, दिनांक ०७/०४/२०१४
२) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाचे पत्र समक्रमांक दिनांक ०३/०७/२०१४
३) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, भारत सरकार, भोपाळ यांचे पत्र क्र.६-एमएचसी ०२९/२०१४-बीएचओ/२११८, दिनांक १७/१२/२०१४.
४) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नंबर-११-३०६/२०१४/एफसी, दिनांक ०७/०५/२०१५.
५) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाचे पत्र समक्रमांक दिनांक ०४/०६/२०१५

आदेश :-

ज्याअर्थी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पी.आय.यु., टोयाटो शोरुम रोड, नाशिक यांच्याकडून प्राप्त झालेला, राष्ट्रीय महामार्ग क्र.५० खेड ते सिन्नर कि.मी. ९७/००० ते १५७/००० (अहमदनगर जिल्हयातील भाग) चार पदरीकरण तसेच मजबुतीकरण करण्याकरिता अहमदनगर जिल्हयातील ३३.९५८५ हेक्टर राखीव वनजमिन वळती करण्याचा प्रस्ताव राज्य शासनास उपरोक्त अ.क्र.१ येथील पत्रानुसार सादर केला होता;

आणि ज्याअर्थी, प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पी.आय.यु., टोयाटो शोरुम रोड, नाशिक यांनी प्रस्तावित केलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्र.५० खेड ते सिन्नर कि.मी. ९७/००० ते १५७/००० (अहमदनगर जिल्हयातील भाग) चार पदरीकरण तसेच मजबुतीकरण करण्याचा प्रस्ताव,

भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम,१९८० च्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रकल्प स्थळ विवक्षित (site specific) आहे, तसेच या प्रस्तावासाठी पर्यायी वनेत्तर जमिन उपलब्ध नसल्याची बाब विचारात घेण्यात आली;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने या प्रस्तावाची काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम-२ अन्वये ३३.९५८५ हेक्टर वनजमिन वळती करण्याची भारत सरकारला शिफारस केली आहे;

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने या प्रस्तावावर नीट विचार करुन, राज्य शासनाने वन (संवर्धन), अधिनियम, १९८० च्या कलम-२ खाली सादर केलेल्या प्रस्तावास वरील अ.क्र.-३ अन्वये तत्वत: मंजुरी दिलेली आहे. ही मंजुरी भारत सरकारच्या दिनांक १७/१२/२०१४ च्या पत्रात नमूद केलेल्या अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणा करेल याच्या अधीन राहून प्रदान केली आहे;

आणि ज्याअर्थी, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी वरील अ.क्र.४ अन्वये वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत एकरेषिय प्रकल्पांना (linear projects) तत्वत: मान्यता मिळाल्यानंतर काही अटींच्या अधीन राहून काम सुरु करण्यास व झाडे तोडण्यास परवानगी देण्याबाबत सर्वसाधारण मान्यता दिली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने त्यांच्या वरील अ.क्र.-५ येथील पत्रान्वये अटी पूर्तता अहवाल पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांना सादर केला आहे;

म्हणून आता महाराष्ट्र शासन याद्वारे असे निर्देश देत आहे की, प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पी.आय.यु., टोयाटो शोरुम रोड, नाशिक यांना, राष्ट्रीय महामार्ग क्र.५० खेड ते सिन्नर कि.मी. ९७/००० ते १५७/००० (अहमदनगर जिल्हयातील भाग) चार पदरीकरण तसेच मजबुतीकरण करण्यासाठी खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे संदर्भ क्र.१ येथील पत्रानुसार सादर केलेल्या प्रकल्प प्रस्तावात अधिक तपशीलात नमूद केलेली ३३.९५८५ हे. वनजमिनीवर काम सुरु करण्यास व झाडे तोडण्यास परवानगी देत आहे. ही परवानगी भारत सरकारच्या दिनांक ०७/०५/२०१५ च्या पत्रातील अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून तसेच खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१) प्रकल्प यंत्रणेने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत तत्वत: मान्यता मिळालेल्या पत्रातील अटींची पूर्तता तात्काळ करुन अंतिम मान्यता प्राप्त होईल याबाबत दक्षता घ्यावी. तत्वत: मान्यता मिळालेल्या दिनांकापासून **एक वर्षाच्या** आत प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत अनुपालन करेल याची मुख्य वनसंरक्षक (प्रा), नाशिक हे खात्री करतील. मुख्य वनसंरक्षक (प्रा), नाशिक याबाबतचा अहवाल वेळोवेळी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील.

२) प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावित वन जमिनीवर काम सुरु करण्यापूर्वी काम सुरु करण्यास तसेच झाडे तोडण्यास परवानगीसाठी संबंधित उप वनसंरक्षक / उप विभागीय वन अधिकारी यांना कळविणे आवश्यक आहे. संबंधित उप वनसंरक्षक / उप विभागीय वन अधिकारी यांनी स्थळ पाहणी करुन प्रस्तावित वनजमिनीवर वनभंग झाला आहे का ते पाहणे. तसेच वनभंग झाला असल्यास, कायद्यानुसार आवश्यक कार्यवाही करावी.

३) उपरोक्त अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (non compliance) संबंधित मुख्य वनसंरक्षक / उप वनसंरक्षक / उप विभागीय वन अधिकारी, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत दिनांक २५/१०/१९९२ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनातील कलम १.९ नुसार अहवाल राज्य शासनामार्फत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, पश्चिम-मध्य क्षेत्र, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांना सादर करतील.

अनुसूची

गावाचे नांव	तालुका व जिल्हा	गट क्र.	वैधानिक दर्जा	क्षेत्र (हे.)
घारगांव	तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर	४१७, २१, १९५	Reserved Forest	१.२७२२
अंबिखालसा		४२४, ४६७		१.०२१४
कर्जुले पठार		१३०, १९३		०.६३७५
पोखरी बाळेश्वर		२४१, २४३, २४४		३.३९५४
चंदनपुरी (गाभनवाडी)		१७२		०.०६३३
खंदारमाळ		९९/१, १९४, १००		१.३७१७
डोळसाने		३१४, ३६८, १७७, १७८		३.०१८६
गुंजाळवाडी पठार		६०/१		०.०४००
गाभनवाडी		१०२, ७१		१५.४२८२
पिंपळगांव डेपा		९६७		०.०२००
वेल्हाडे		१६६/५		०.२५५६
सायखिंडी		५५		१.२१६०
कऱ्हे		४८१, ४८२, ४८३, ४८४		६.२१८६
			एकूण	३३.९५८५ हे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६२४१६२९४३४२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TIWARI VIRENDRA RAMBAHAL

Digitally signed by TIWARI VIRENDRA RAMBAHAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST,CID - 917243, postalCode=400032, st=Maharashtra, cn=TIWARI VIRENDRA RAMBAHAL
Date: 2015.06.24 16:44:11 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)

मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत- टप्पा-१ च्या मंजुरी आदेशासह वरील आदेश आपल्या वेबसाईटवर अपलोड करण्याच्या विनंतीसह :

१. सचिव, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सेंट्रल) , पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर

प्रत :

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. प्रधान सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. मुख्य वनसंरक्षक (वन संवर्धन), नागपूर
९. मुख्य वनसंरक्षक (प्रा), नाशिक
१०. जिल्हाधिकारी, अहमदनगर
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर
१२. उप विभागीय वन अधिकारी, संगमनेर
१३. प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पी.आय.यु., टोयाटो शोरुम रोड, नाशिक
१४. निवडनस्ती (फ-१०)

२. जिल्हाधिकारी, अहमदनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर व उप विभागीय वन अधिकारी, संगमनेर यांना निर्देशित करण्यात येते की, वरील आदेशाची प्रत स्थानिक

संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच त्यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर तसेच वरील कार्यालय प्रमुखांच्या सूचना फलकावर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शिले जातील याची खात्री करावी.

३. प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पी.आय.यु., टोयाटो शोरुम रोड, नाशिक यांना निर्देशित करण्यात येते की, वन मंजुऱ्यांचे सर्व आदेश, सर्व्हे क्र., गट क्र. त्यांचे प्रत्येकाचे क्षेत्र आणि वैधानिक दर्जा इ. आणि केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एक स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत आणि त्याची प्रत उप विभागीय वन अधिकारी, संगमनेर व मुख्य वनसंरक्षक (प्रा), नाशिक यांना देण्यात यावी.

४. स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, आदेशांची प्रत मिळाल्यापासून ३० दिवसापर्यंत सदर आदेश सूचना फलकावर प्रदर्शित करावे.

Issue of working permission for tree cutting and commencement of Work.

Diversion of 33.9585 Ha. of Reserved Forest land for Rehabilitation and upgrading to 4 laning of NH-50 from Khed to Sinnar from Km 97/000 to 157/000 (Ahmednagar district portion) in Ahmednagar Dist.

Government of Maharashtra

Revenue and Forest Department

Government Order No.FLD-1814/CR-92/F-10

Mantralaya, Mumbai 400032.

Date: 24/06/2015

Read:

1) Letter from Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur, No.Desk-17/NC/II/I.D.12323/(13)/58/14-15,dt 7/4/2014
2) Letter from Government of Maharashtra of even no. dated 03/07/2014.
3) Letter from Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office, Western Region, Bhopal no.6-MHC 029/2014-BHO/2118, dated 17/12/2014
4) Letter from Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi F.No.11-306/2014-FC, dated 07/05/2015.
5) Letter from Government of Maharashtra of even no. dated 04/06/2015

Order :-

Whereas, the Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force) Maharashtra State, Nagpur, vide his letter referred at sr. no.1 above, has submitted a proposal to the State Government, which has been received from Project Director, National Highways Authority of India, Project Implementation Unit, Toyota Showroom Road, Nashik for diversion of 33.9585 Ha. of forest land for Rehabilitation and upgrading to 4 laning of NH-50 from Khed to Sinnar from Km 97/000 to 157/000 (Ahmednagar district portion) purpose;

AND whereas, Project Director, National Highways Authority of India, Project Implementation Unit, Toyota Showroom Road, Nashik's proposal for Rehabilitation and upgrading to 4 laning of NH-50 from Khed to Sinnar from Km 97/000 to 157/000 (Ahmednagar district portion) in Ahmednagar district and as per Government of India, Forest (Conservation) Act, 1980 guidelines the project is site specific and non-availability of alternative non-forest land for Rehabilitation and upgrading to 4 laning of NH-50 from Khed to Sinnar from Km 97/000 to 157/000 (Ahmednagar district portion) purpose was considered;

AND whereas, Government of Maharashtra after careful scrutiny and consideration has recommended it to the Government of India to divert the 33.9585 ha. of forest land for the above project under section 2 of Forest (Conservation) Act, 1980;

AND whereas, Government of India after due consideration vide its letter referred at sr. no. 3 above granted in-principle approval to above proposal submitted by Government of Maharashtra for diversion of forest land under section 2 of Forest (Conservation) Act, 1980. The said approval is subject to fulfillment of certain conditions by the User Agency mentioned in its letter dated 17/12/2014;

AND whereas, Government of India, Ministry of Environment, Forests & Climate Change has given its general approval under the Forest (Conservation) Act, 1980 that for linear projects in-principle approval under Forest (Conservation) Act, 1980 may be deemed as working permission for tree cutting and commencement of work, subject to condition mentioned in Government of India's letter referred at Sr.No.4 above.

AND whereas, the Government of Maharashtra vide letter referred at sr. no.5 above has submitted compliance of those conditions to the Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office (WCZ), Nagpur;

NOW, therefore, Government of Maharashtra hereby grants working permission for tree cutting and commencement of work for the proposal of diversion of 33.9585 ha. of Forest land more specifically described in the proposal submitted vide letter mentioned at sr. no.-1 here in above from Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur and as per details given in the Schedule given below, subject to condition mentioned in Government of India's letter referred at Sr.No.4 above to the User Agency, i. e. Project Director, National Highways Authority of India, Project Implementation Unit, Toyota Showroom Road, Nashik for Rehabilitation and upgrading to 4 laning of NH-50 from Khed to Sinnar from Km 97/000 to 157/000 (Ahmednagar district portion) purpose. This working permission for tree cutting and commencement of work is also subject to compliance of following conditions by the User Agency-

1. The User Agency shall comply with all the conditions stipulated in the in-principle approval and shall seek & obtain final / formal approval of Government of India under Forest (Conservation) Act, 1980 for diversion of such forest land at the earliest and in any case not later than **one year** from the date of grant of in-principle order. The Chief Conservator of Forests (Territorial), Nashik shall ensure the strict compliance of the conditions by the User Agency. Chief Conservator of Forests (Territorial), Nashik will furnish the report in this regard to Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur from time to time.
2. The User Agency shall inform the concerned Sub Divisional Forest Officer / Deputy Conservator of Forests by letter before date of commencement of work and tree cutting in proposed forest land. The concerned Deputy Conservator of Forests shall immediately inspect the proposed forest land and shall ensure that there is no violation of any law. In case of violation, the concerned Deputy Conservator of Forests shall take actions as per the law.
3. In case of non-compliance of any of the above conditions, the concerned Chief Conservator of Forests / Sub Divisional Forest Officer / Deputy Conservator of Forests

shall report through the State Government to Additional Principal Chief Conservator of Forests, Government of India, Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office (WCZ), Nagpur as per procedure laid down in the clause 1.9 of guidelines on 25/10/1992 under the Forest (Conservation) Act, 1980.

SCHEDULE

Village	Taluka & Dist.	Gut No	Legal Status	Area in Ha.
Ghargaon	Tal. Sangamner Dist. Ahmednagar	417, 21, 195	Reserved Forest	1.2722
Ambikhalsa		424, 467		1.0214
Karjule Pathar		130, 193		0.6375
Pokhari Baleshwar		241, 243, 244		3.3954
Chandanapuri (Gabhanwadi)		172		0.0633
Khandarmal		99/1, 194, 100		1.3717
Dolasane		314, 368, 177, 178		3.0186
Gunjalwadi Pathar		60/1		0.0400
Gabhanwadi		102, 71		15.4282
Pimpalgaon Depa		967		0.0200
Velhade		166/5		0.2556
Saykhindi		55		1.2160
Karhe		481, 482, 483, 484		6.2186
			Grand Total	**33.9585 Ha**

This Government Order of Maharashtra Government is available on its website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201506241629434219. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

TIWARI VIRENDRA RAMBAHAL

Digitally signed by TIWARI VIRENDRA RAMBAHAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST,CID - 917243, postalCode=400032, st=Maharashtra, cn=TIWARI VIRENDRA RAMBAHAL
Date: 2015.06.24 16:44:39 +05'30'

(Virendra Tiwari)

Chief Conservator of Forests (Mantralaya)

Copy forwarded with request to upload this order on their website along with the Stage-I clearances to:

1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi
2. Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office (WCZ), Nagpur

Copy to:

1. Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State, Nagpur
2. Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State, Nagpur
3. Principal Secretary (Roads), Public Works Department, Mantralaya, Mumbai
4. Principal Secretary, Tribal Development Department, Mantralaya, Mumbai
5. Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.
6. Additional Principal Chief Conservator of Forests (CAMPA), Maharashtra State, Nagpur
7. Additional Principal Chief Conservator of Forests (Conservation), Maharashtra State, Nagpur.
8. Chief Conservator of Forests (Forest Conservation), Nagpur.
9. Chief Conservator of Forests (Territorial), Nashik.
10. Collector, Ahmednagar
11. Chief Executive Officer, Zilla Parishad, Ahmednagar
12. Sub Divisional Forest Officer, Sangamner
13. Project Director, National Highways Authority of India, Project Implementation Unit, Toyota Showroom Road, Nashik
14. Select File Desk F-10.

2. Collector, Ahmednagar, Chief Executive Officer, Zilla Parishad, Ahmednagar and Sub Divisional Forest Officer, Sangamner are hereby directed to forward the copy of this order to concerned Heads of Local Bodies, Panchayats, Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government and they shall also ensure the display of this order on their notice board as well as on the notice board of local self government bodies for the information of general public.

3. Project Director, National Highways Authority of India, Project Implementation Unit, Toyota Showroom Road, Nashik is hereby directed that they should publish the entire order of working permission for tree cutting and commencement of work granted in verbatim along with the details of Survey No., Gut No., area and legal status of each Survey, Gut No.etc. along with the conditions and safe guards imposed by the Central Government while granting working permission for tree cutting and commencement of work in two widely circulated daily newspapers, one in vernacular language and other in English language and submit the copies of newspapers to Chief Conservator of Forests (Territorial), Nashik & Sub Divisional Forest Officer, Sangamner

4. Heads of Local Bodies, Panchayats and Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government are hereby directed to display the same on their notice board for 30 days from the date of receipt for the information of general public.